# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना अनुसूचित जातीच्या घटकापर्यंत पोहचविण्याबाबत

**(१) २३०४ (१८-०३-२०२०) ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना व आवश्यक तो निधी अनुसूचित जातीच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी विभागाच्या अधिकाऱ्यांनी या योजनाचा व निधीचा सर्वकष असा विकास आराखडा सादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागाच्या विशेषत: शिष्यवृत्ती योजना, स्वाधार योजना, वसतिगृह आणि निवासी शाळा, रमाई आवास घरकुल (शहरी व ग्रामीण) योजना, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांच्या योजना इ. वर नव्याने अहवाल सादर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व योजनांच्या निधीमध्ये वाढ करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, यानुषंगाने सर्व योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) शिष्यवृत्ती योजना, स्वाधार योजना, वसतिगृह आणि निवासी शाळा, रमाई आवास घरकुल (शहरी व ग्रामीण) योजना, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांच्या योजनांसाठी मागणी विचारात घेऊन निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेबाबतचे निकष/ मार्गदर्शक सूचना संबंधित विभागाच्या असून याची अंमलबजावणी ही विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात येते. तसेच अर्थसंकल्पीय तरतूद करताना क्षेत्रिय कार्यालयाकडून तसेच संबंधित विभागांकडून आवश्यक निधीची मागणी घेऊन, योजनांचे स्वरुप, लाभार्थी संख्या, मागील आर्थिक वर्षात झालेला खर्च इ. या बाबी विचारत घेऊन वरिष्ठ स्तरावर बैठक घेऊन उपलब्ध निधीनुसार योजनांसाठी निधी अर्थसंकल्पीत करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील पुलांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२) १५४९८ (२९-१२-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील अनेक पूल धोकादायक स्थितीत असून पुलांच्या डागडुजीकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील काही पुलांचे रेलिंग तुटले आहेत तर काहींचे सज्जे पडले आहेत काही पुलावर रस्ते उखडले असून शहरातील पुलांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील पुलांची देखभाल, दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०२-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही.

नागपूर शहरातील महानगरपालिकेच्या पुलांची सुस्थितीची तपासणी व क्षतीग्रस्त पुलांची दुरुस्ती नियमितपणे करण्यात येते. शहरातील पुलांच्या सर्वेक्षणाअंती ज्या पुलांची तातडीने दुरुस्ती/पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे अशा पुलांच्या दुरुस्तीची कार्यवाही महानगरपालिकेने सुरु केलेली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील नदीकाठची गावे आणि शहरांमधून दररोज निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबाबत

**(३) १७३५१ (२५-०३-२०२३) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नदीकाठची गावे आणि शहरांमधून दररोज निर्माण होणाऱ्या ९७५ कोटी ८० लाख लिटर सांडपाण्यापैकी केवळ ३६.२% म्हणजे ३५३ कोटी २० लाख लिटर पाण्यावर प्रक्रिया होत असून उर्वरित पाणी प्रक्रिया न करताच सोडण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रक्रिया न करता सांडपाणी थेट नद्यांमध्ये सोडल्यामुळे जलजीवांसह नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व गावे व शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक करण्याबाबत तसेच सांडपाणी थेट जलस्त्रोतात सोडण्यास निर्बंध घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०१-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यातील शहरांच्या हद्दीमध्ये निर्माण होणाऱ्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता अमृत, अमृत २.०, नगरोत्थान इ. या योजनेंतर्गत भूमीगत गटार योजना तसेच सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

सद्य:स्थितीमध्ये राज्यातील शहरांमध्ये १०५४७ दश लक्ष लिटर इतके घरगुती सांडपाणी निर्माण होत असून त्यावर प्रक्रिया करण्याकरीता ७४११ दश लक्ष लिटर इतकी क्षमता असणारे १४९ सांडपाणी प्रक्रीया केंद्र उभारण्यात आलेले आहेत व त्यामधून ४२६६.११ दश लक्ष लिटर इतक्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते.

राज्यातील नदी प्रदूषित पट्ट्यांमध्ये ३३६ दश लक्ष लिटर क्षमतेचे २७ घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच ४२१९.६८ दशलक्ष लिटर क्षमतेची नवीन ९० घरगुती सांडपाणी प्रक्रीया यंत्रणा उभारणे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भडगाव (जि.जळगाव) येथे महिलेस पेटवून दिल्याची घटना घडल्याबाबत

**(४) १७६५१ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव (जि.जळगाव) येथे शारीरिक संबंधास विरोध करणाऱ्या महिलेस पेटवून दिल्याची घटना दिनांक २३ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२४) :** (१) व (२) भडगांव, जि.जळगाव येथील भडगांव पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.३३०/२०२२, कलम ३०७, ३५४, ३५४(अ), ३२३, ५१० सह वाढीव कलम ३०२ भा.द.वि. अन्वये अज्ञात इसमा विरुध्द दिनांक २४/११/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरु आहे.

तपासा दरम्यान पिडीत फिर्यादी महिला ही दुर्धर आजाराने ग्रस्त होती. ती आपल्या आजाराला कंटाळली होती. आजारामुळे पती व मुलांना त्रास होऊ नये म्हणून तिने आजाराला वैतागून स्वत:स जाळून घेतले असे तपासामध्ये निष्पन्न झाले. गुन्ह्यात भडगांव पोलीस स्टेशन यांनी अंतिम अहवाल दिनांक ०६/०३/२०२३ रोजी मा.न्यायालयात “ब” फायनल समरी अहवाल सादर केला आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## राज्य मार्ग परिवहन महामंडळातील बसेस पीयुसी चाचणीविना कार्यरत असल्याबाबत

**(५) १७६९० (२५-०३-२०२३) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडील ७५० बसेसपैकी ३३३ बसेसची पीयुसी चाचणी करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बसेसमुळे पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झाला असून सदर एसटी बसेसच्या विरुध्द दंडाची कारवाई सुध्दा होऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू बसेसची पीयुसी चाचणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०१-२०२४) :** (१) व (२) नाही.
(३) व (४) सांगली विभागाच्या वाहन ताफ्यामध्ये ६८१ स्वमालकीची प्रवाशी वाहने समाविष्ट आहेत. रा.प.सांगली विभागातील माहे मे २०२२ ते जुलै २०२२ या कालावधीमध्ये विभागीय कार्यशाळेत ४८ वाहनांच्या आरटीओ पासिंगच्या वेळी वाहनांची पीयुसी चाचणी करण्यात आलेली होती. या कालावधीतील वाहनांची सहा माहिन्यानंतर आगार पातळीवर पीयुसी चाचणी होणे आवश्यक होते. परंतु ४८ वाहनापैकी ४४ वाहनांची आगार पातळीवर विहीत कालमर्यादेत पीयुसी चाचणी न झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांची माहे मे २०२३ मध्ये पीयुसी चाचणी करण्यात आलेली आहे.

---

## जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी)(जि.छत्रपती संभाजीनगर) या संस्थेवर अतिरिक्त कार्यभार असलेले कार्यकारी अभियंता यांची चौकशी करण्याबाबत

**(६) १८७८० (२४-१२-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी)(जि.छत्रपती संभाजीनगर) या संस्थेवर लेखाधिकारी या पदावर असलेलेल्या अधिकाऱ्याला महासंचालक, वाल्मी यांनी कार्यकारी अभियंत्याचा अधिभार दिल्यानंतर त्यांनी नियम बाह्यपध्दतीने कामे केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महासंचालक, वाल्मी यांनी श्री.बाहेकर यांना तांत्रिक अधिकारी पदाचा अनुभव नसताना, निकष डावलून त्यांना कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आल्याने त्यांनी अनेक कामांमध्ये गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेबर, २०२२ मध्ये केल्या असून सदर अधिकाऱ्याला लाचलुचपत अधिकाऱ्यांनी लाच घेताना अटक केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महासंचालक, वाल्मी व श्री.बाहेकर, कार्यकारी अभियंता यांनी संगनमताने वाल्मी या संस्थेतील सी.सी.टीव्ही. बसविणे, हॉटेल व्यवस्थापन, लॅब दुरुस्तीची रुपये १० लक्ष खर्चाची कामे विनानिविदा आपल्या मित्र व नातेवाईकांना दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी आहे काय, चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने वाल्मी संस्थेतील लेखाधिकारी व महासंचालक यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१६-०२-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे. नियम बाहयपध्दतीने कामे केल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) आवक रजिस्टर मध्ये तशी तक्रार अर्जाची नोंद आढळून येत नाही. तथापि, सदर अधिकाऱ्यांनी लाच घेताना अटक केली होती.
(३) कामे प्रचलित नियमाप्रमाणे केली आहेत.
(४) आवश्यकता नाही.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## राज्यात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तीतील प्रदूषणकारी घटक कमी करण्यासंदर्भात नेमण्यात आलेल्या समितीबाबत

**(७) १८९४३ (०८-०८-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तीतील प्रदूषणकारी घटक कमी करणे अथवा इतर काही पर्याय उपलब्ध करण्यासंदर्भात मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येत असल्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीचे स्वरूप व कार्यकक्षा काय आहे,
(३) असल्यास, मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील सदरहू समितीचा अहवाल किती कालावधीत शासनास प्राप्त होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पर्यावरणपूरक सण साजरे करण्याच्या अनुषंगाने शासनास शिफारशी करण्याकरीता दिनांक २४/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीत प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, आय.आय.टी मुंबई, राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था यांचे प्रत्येकी एक प्रतिनिधी, डॉ.शरद काळे (तांत्रिक तज्ञ), डॉ. यशवंत सोनटक्के (तांत्रिक तज्ञ, पर्यावरण), डॉ. अजय देशपांडे (तांत्रिक तज्ञ) हे सदस्य असून सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे समितीचे सदस्य सचिव तसेच सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे सदर समितीचे संयोजक आहेत.
समितीची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत –

- प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्तींमधील प्रदूषणकारी घटक कमी करण्याच्या शक्यतेची पडताळणी करून पुढील तीन महिन्यात याबाबतचा प्राथमिक अहवाल सादर करणे.
- केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १२/०५/२०२० रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार पर्यावरणपूरक उत्सव साजरे करण्याच्या अनुषंगाने गठित केलेल्या समितीने सादर

केलेल्या धोरणाच्या मसूद्याचे पुनर्विलोकन करून सदर धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता शासनास शिफारशी सादर करणे.

• प्रदूषण कमी करण्यासाठी व पर्यावरणपूरक पध्दतीने सण साजरे करण्याबाबत तांत्रिक समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनास शिफारशी करणे.

• पर्यावरणपूरक उत्सव साजरे करण्यास्तव अन्य बाबी / मुद्दयांच्या अनुषंगाने शिफारस करणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी येथील नवा मोंढा, ताडकळस येथे प्रस्तावित नवीन पोलीस ठाण्याच्या उभारणी बाबत

**(८) १९०४६ (०४-०८-२०२३) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील नवा मोंढा, ताडकळस व इतर ठाण्याचे विभाजन करून शहरासाठी प्रस्तावित नवीन एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन उभारण्यासाठी पोलीस अधीक्षक व इतरांनी जागेची पाहणी करून सन २०२३ मध्ये वा त्यादरम्यान जागा निश्चित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवीन एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(३) असल्यास, सदरील पोलीस ठाणे किती कालावधीत कार्यान्वयीत होईल?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०२४) :** (१) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांनी दिनांक ०९/०८/२०२३ अन्वये एम.आय.डी.सी. पोलीस ठाणेकरीता जमीन पोलीस विभागास प्रदान करण्यास मान्यता दिली आहे. तसेच एम.आय.डी.सी विभागातील प्लॉट क्र. पी-१४ पोलीस विभागाच्या ताब्यात देण्यात आला आहे.

(२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने "पोलीस ठाणे नवा मोंढा, परभणी ग्रामीण आणि ताडकळसचे विभाजन करुन नवीन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे निर्माण करणे" बाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. उक्त प्रस्तावात त्रुटी आढळून आल्याने, त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास कळविण्यात आले आहे.

(३) सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार तपासून, पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील वीजदरावर महागड्या आयात कोळशाचा परिणाम होत असल्याबाबत

**(९) १९१२७ (०४-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत उन्हाळयात होणारी सर्वाधिक विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी बाहेरुन घेण्यात येणारी वीज मर्यादित स्वरुपाची असल्याने, वीज निर्मितीसाठी आयात केलेला कोळसा व वायू महाग असला तरीही टाटा पॉवरच्या ट्रॉम्बेतूनच वीज खरेदी करावी लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे मुंबईतील वीज दरावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने मुंबईत बाहेरुन वीज आणणारी यंत्रणा उभारण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०४-२०२४) :** (१) होय.

मुंबई शहराला पारेषण निर्बंधामुळे बाहेरून वीज खेरदी करण्यास मर्यादा येते. तसेच उन्हाळी हंगामात मुंबई शहरात वीजेच्या मागणीत वाढ होते. मुंबई शहराला वीजेचा खात्रीशीर पुरवठा करण्याकरीता वितरण परवानाधारकांचे टाटा पॉवर कंपनी सोबत खरेदी करार आहेत. पारेषण कॉरिडॉर्समधील मर्यादेमुळे आयलॅण्डिंग शक्य होण्याच्या दृष्टिने व झालेला करार पाहता, वितरण परवानाधारकांना आयात केलेल्या कोळशावर चालणाऱ्या टाटा पॉवरच्या ट्रॉम्बे येथील वीज निर्मिती केंद्रामधून वीज खरेदी करणे बंधनकारक आहे.
(२) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीज दराबाबत दिलेल्या आदेशानुसार ग्राहकांकडून वीजदर आकारला जातो. सदर आदेशानुसार वीज खरेदी खर्चातील वास्तविक तफावत ग्राहकांकडून मा.आयोगाच्या मान्यतेनुसार ठराविक कालावधीकरीता इंधन समायोजन अधिभार (FCA) द्वारे वसूल करण्यात येतो. त्यामुळे देयकात वाढ/घट होत असते.
(३) मुंबई महानगर क्षेत्राची वर्तमान व भविष्यातील संभाव्य वीज मागणी लक्षात घेता, तसेच, मुंबई अंतर्गत वीज निर्मिती क्षमतेत तूर्तास वाढ शक्य नसल्याने, मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार महापारेषण कंपनीद्वारे, तसेच खाजगी कंपन्यांकडून मुंबईत बाहेरुन वीज आणणाऱ्या पारेषण वाहिन्या उभारण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील हजारो जुन्या इमारतींचा रखडलेला स्वयंपुनर्विकास ''एक खिडकी'' योजनेतून करण्याच्या निर्णयाबाबत

**(१०) १९३९९ (०४-०८-२०२३) श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील हजारो जुन्या इमारतींचा रखडलेला स्वंयपुनर्विकास “एक खिडकी” योजनेतून करण्यात येणार असून मानीव अभिहस्तांतरण एक महिन्यात पूर्ण करण्याचा निर्णय राज्य शासनाने दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी केंव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री.अतुल सावे (१४-०२-२०२४) :** (१),(२) व (३) गृहनिर्माण विभाग दिनांक २९/०८/२०२३ रोजीच्या शासननिर्णयान्वये एक खिडकी योजनेच्या माध्यमातून सहकारी गृहनिर्माण संस्थांना स्वयंपुनर्विकासाच्या योजनेतील सर्व परवानग्या या प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत पूर्ण करणे बंधनकारक राहील असे सर्व संबंधित नियोजन प्राधिकरणांना निर्देशित करण्यात आले आहे. तसेच सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांच्या दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वयंपुनर्विकास करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मानीव अभिहस्तांतरण प्रस्तावावर नमुना क्र.१० ची नोटीस दिल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत निर्णय घेणे बंधनकारक असल्याबाबत सर्व संबंधित कार्यालयांना निर्देशित करण्यात आले आहे.

---

## अमरावती शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्याबाबत

**(११) १९४३५ (०४-०८-२०२३) श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असल्याचे कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्याची मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील गाडगेनगर, फेजरपुरा, नांदगांव पेठ, खोलापूरी गेट, वलगांव येथे नव्याने पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०२४) :** (१) अमरावती शहरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत असल्याने पोलीस आयुक्त, अमरावती शहर कार्यक्षेत्रांतर्गत पुढील पोलीस ठाणे निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

१. पोलीस ठाणे साईनगर

२.पोलीस ठाणे एम.आय.डी.सी.

३.पोलीस ठाणे तपोवन

(२) पोलीस आयुक्त, अमरावती यांनी उक्त १) पोलीस ठाणे साईनगर निर्मितीसाठी सादर केलेल्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्याने, त्रुटींची पूर्तता करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाने पोलीस आयुक्त, अमरावती यांना कळविले आहे.

तसेच, पोलीस ठाणे एम.आय.डी.सी व पोलीस ठाणे तपोवन च्या निर्मितीकरीता संबंधित जिल्हाधिकारी यांचे संमतीपत्र आवश्यक असल्याने, पोलीस आयुक्त, अमरावती यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना प्रस्ताव सादर केला आहे.

उक्त पोलीस ठाणे निर्मितीचे प्रस्ताव अद्याप शासनास अप्राप्त आहेत. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत अनेक भागांमध्ये दरड कोसळून दुर्घटना होत असल्याबाबत

**(१२) २०३९४ (०९-०८-२०२३) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दर पावसाळ्यात अनेक भागात दरड कोसळून दुर्घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर पावसाळयापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेने वॉर्ड स्तरावर संभाव्य धोका टाळण्यासाठी दरड कोसळणारे स्पॉट शोधले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत ७० हून अधिक ठिकाणी पावसाळ्यात दरड कोसळण्याचा धोका असून त्यातील जास्त धोकादायक ठीकाणे ही भांडुप, विक्रोळी, कुर्ला, घाटकोपर अशा पूर्व उपनगरात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा ठिकाणी दरड कोसळून कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी आवश्यक ठिकाणी तातडीने संरक्षक भिंत बांधण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबईतील संभाव्य दरडी कोसळण्याच्या ठिकाणी करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभागाने निश्चित केलेल्या ७४ ठिकाणी प्राधान्याने संरक्षक भिंती बांधणे तसेच आवश्यक त्या इतर योजना करण्यासंदर्भात संबंधित यंत्रणांना कळविण्यात आले आहे.

यात्व्यतिरिक्त लोकप्रतिनिधींकडून प्राप्त संभाव्य दरडी कोसळण्याच्या ठिकाणी संरक्षक भिंती बांधावयाच्या कामांची आवश्यकता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागांमार्फत पडताळण्यात आली असून, एकूण ७२८ ठिकाणी संरक्षक भिंती बांधण्याची आवश्यकता असल्याचे संबंधित जिल्हाधिकारी तसेच जिल्हा उपनियोजन अधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

संरक्षक भिंती बांधण्याचे काम जिल्हाधिकारी, मुंबई शहर व उपनगरे यांच्या माध्यमातून म्हाडा तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बेस्ट बसमध्येही ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास सवलत देण्याबाबत

**(१३) २०४२७ (०९-०८-२०२३) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांना राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये मोफत प्रवासाची सवलत देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच धर्तीवर मुंबईतील बेस्ट प्रवासांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सवलत देण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०३-२०२४) :** (१) राज्य शासनाने ७५ वर्षे वयोमर्यादेवरील ज्येष्ठ नागरिकांना महाराष्ट्र राज्य रस्ते मार्ग परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांमधून मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध केली आहे.
(२) अशा प्रकारची मागणी काही लोकप्रतिनिधींनी बेस्ट उपक्रमाकडे केली आहे.
(३) बेस्ट उपक्रमाच्या बससेवेमध्ये ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मासिक बसपासमध्ये रुपये ५०/- इतकी सवलत देण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महावितरण व महाजनकोच्या निष्काळजीपणामुळे मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांस नुकसान भरपाई व रोजगार उपलब्ध करून देणेबाबत

**(१४) २०८८३ (२८-०७-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाजनकोच्या भांडेवाडी पारडी नागपूर येथील वॉटर फिल्टर प्लान्टच्या सुरक्षा भिंतीलगत गेलेल्या विदयुत वाहक तारेला स्पर्श होवून कुमार जगत विनोद निंबार्ते याचा दिनांक २६ मे, २०२० रोजी मृत्यू झाला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी रितसर तक्रार, चौकशी व पंचनामा आदि प्रक्रिया तथा विदयुत निरीक्षक यांनी दिलेल्या अभिप्राय अहवालानुसार महावितरण तसेच महाजनकोच्या निष्काळजीपणामुळे सदर अपघात झाल्याचा अभिप्राय देण्यांत आला आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यानुसार मृतकाच्या परिवाराला आवश्यक नुकसान भरपाई तथा कुटूंबाप्रती सहानुभूती हेतू मृतकाच्या मोठ्या भावास औष्णीक विदयुत प्रकल्पात कंत्राटी पध्दतीने रोजगार मिळणेबाबत विनंती अर्ज परिवाराने सादर करूनही अद्यापही याबाबत कुठलीही कार्यवाही महाजनको तथा महावितरण तर्फे झालेली नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शसनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणी दखल घेवून आवश्यक नुकसान भरपाई व रोजगार उपलब्ध करून मृतकाच्या परिवाराला न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २६/०५/२०२० रोजी दिवंगत जगत विनोद निंबार्ते, लहान मुलांसोबत वॉटर फिल्टर प्लांटच्या क्षेत्राबाहेर क्रिकेट खेळत असताना कोराडी औष्णिक विद्युत केंद्रापासून ३० कि.मी. लांबीवर असलेल्या वॉटर प्लांटच्या कंपाऊंड वॉलच्या आत चेंडू गेल्यामुळे चेंडू काढण्यासाठी अवैधरित्या प्रवेश केल्यावर सदर दुर्घटना घडलेली आहे.
(२) होय.

उपरोक्त घटनेची विद्युत निरीक्षक, नागपूर यांनी चौकशी केली असून त्यांनी घटनेतील अपघात महावितरणच्या सदोष विजसंचमाडणीवर व महाजनकोच्या निष्काळजीपणामुळे घडून आल्याचे अभिप्राय दिले आहेत.

(३) विद्युत निरीक्षक, नागपूर यांच्या अहवालानुसार महानिर्मिती व महावितरण यांच्याद्वारे एकूण चार लाख रुपये दिवंगत जगत विनोद निंबार्ते यांचे अवलंबीत वडील श्री.विनोद भगवानजी निंबार्ते यांना अदा केले आहेत.

तसेच मृत जगत विनोद निंबार्ते हे महानिर्मिती कंपनीच्या सेवेत नसल्यामुळे मृतकाच्या वारसांना नोकरी देण्याची कोणतीही तरतूद नाही.

(४) महानिर्मिती व महावितरण यांच्याद्वारे उपरोक्त प्रमाणे कार्यवाही झाली असून चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोंडउमरे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील टवळी येथे नदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्याबाबत

**(१५) २१२४२ (०४-०१-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंडउमरे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील टवळी नदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्याकरीता ड्रीलिंगचे काम करण्यात आले असून सदर बंधाऱ्याचे काम निधीअभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्यामुळे संगमेश्वर तालुक्यातील कोंडउमरे, हेदली, अंत्रवली, कळंबस्ते या गावांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होणार असून पाळीव जनावरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने याठिकाणी कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ ऑक्टोबर २०२३ रोजी वा त्यादरम्यान मा.जलसंधारण मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (२३-०२-२०२४) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे. कोंडउमरे येथे कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याकरीता सर्वेक्षण व अण्वेक्षणाचे काम करण्यात आलेले आहे. तथापि, ग्रामस्थ हेदली यांनी सदरील बंधाऱ्यास विरोध असल्याचे कळविले असल्याने काम सद्य:स्थितीत प्रलंबित आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) सदरील बंधाऱ्याचे सर्वेक्षण व अण्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले असून बंधाऱ्याच्या मुख्य कामाच्या प्रशासकीय मंजुरीच्या अनुषंगाने दोन्ही तिरावरील ग्रामपंचायतीचे ग्रामसभा प्रस्ताव अद्याप अप्राप्त असल्याने याप्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर ठराव प्राप्त होताच को.प.बंधाऱ्याचे अंदाजपत्रक तयार करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहर आणि जिल्ह्यात महापारेषणचे सबस्टेशन आणि पॉवर ट्रान्सफॉर्मरची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१६) २१३४३ (०४-०१-२०२४) श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरासाठी वीज पुरवठा करण्याकरीता महत्त्वाचे असणारे जातरोडी सबस्टेशनच्या वीज तारांचे जाळे तयार झाले नसल्यामुळे सबस्टेशन कार्यान्वित झाले नसल्याचे माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यात महापारेषणच्या लेंडा पार्क व मिहान सबस्टेशनच्या प्रस्तावित कामाला मंजुरी मिळूनही अद्याप काम प्रलंबित असून खापरी येथे प्रस्तावित पॉवर ट्रान्सफॉर्मर लावण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नागपूर शहरासाठी सब स्टेशन कार्यान्वित करणे, पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवणे तसेच वीज तारांचे जाळे तयार करून लोड शेडिंग थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०१-०४-२०२४) :** १) होय, हे अंशत: खरे आहे.

जात तरोडी उपकेंद्र व भूमीगत केबलचे काम सुरु आहे.

(२) होय. हे ही अंशत: खरे आहे.

लेंड्रा पार्क व मिहान उपकेंद्र उभारणीसाठीची निविदा प्रक्रिया सुरु असून खापरी उपकेंद्रात अतिरिक्त रोहित्र उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) १३३/३३ के.व्ही. जात तरोडी Gas Insulated Substation चे काम अंदाजे ७०% पूर्ण झाले असून १३२ के.व्ही. जात तरोडी ते २२०/१३२ के.व्ही. नवीन पारडी उपकेंद्र अशी १३२ के.व्ही. भूमीगत द्विपथ केबल अंथरण्याचे काम दिनांक ०३/१०/२०२३ पासून सूरू झाले असून वाहिनी व उपकेंद्राचे काम पूर्ण करुन १३२ के.व्ही. जात तरोडी उपकेंद्र महापारेषण कंपनीद्वारे जून २०२४ पर्यंत कार्यान्वित करण्याचे नियोजित आहे.

तसेच मंजूर असलेल्या १३२ के.व्ही. लेंड्रा पार्क व मिहान या Gas Insulated Substation च्या उभारणीसाठीची निविदा प्रक्रिया सुरु असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन यशस्वी कंत्राटदारास कार्यादेश देऊन दोन्ही उपकेंद्रांची कामे सुरु करण्याचे नियोजित आहे. या पैकी लेंड्रा पार्क उपकेंद्राची भूमीगत केबल अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे.

त्याचप्रमाणे १३२/३३ के.व्ही. खापरी उपकेंद्रात अतिरिक्त १३२/३३ के.व्ही., २५ एम.व्ही.ए क्षमतेचे रोहित्र उभारण्यासाठीचा कार्यादेश देण्यात आला असून काम प्रगतीपथावर आहे. महापारेषण कंपनीद्वारे सदर काम डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

सद्य:स्थितीत नागपूर जिल्ह्यात/ शहरात महापारेषण कंपनीकडून भार नियमन करण्यात येत नाही. परंतु भविष्यातील संभाव्य वीज मागणीचा पुरवठा करण्यासाठी व नागपूर शहर व जिल्ह्यातील अति उच्चदाब वीज प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी महापारेषण कंपनीद्वारे आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरण कंपनीतील लाईन स्टाफ कर्मचाऱ्यांचे वेतन तफावतीबाबत

**(१७) २१३६० (०४-०१-२०२४) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीत लाईन स्टाफच्या हजारो जागा रिक्त असूनही प्रतिकूल परिस्थितीत, आपतकालीन स्थितीतसुद्धा १००% कामावर हजर राहून सेवा दिलेली असून कोरोनासारख्या महामारीच्या काळात उद्भवलेली थकबाकीची वसुली करून महावितरणाची आर्थिक स्थिती सुस्थितीत आणण्यासंदर्भात मदत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण लाईनस्टाफ कर्मचारी यांची स्वतंत्र वेतनश्रेणी करून वर्ग ४ मधून वर्ग ३ मध्ये वर्गीकरण करून तार मार्ग निरीक्षक व तारमार्ग बांधकाम कार्यदेशक ही पदे पूर्ववत चालू करण्याबाबत महावितरण मधील ग्रामीण व शहरी भागातील लाईन स्टाफ यांचे कामाचे स्वरूप व कामाचे तास निश्चित करावे, महावितरण लाईन स्टॉप कर्मचाऱ्यांना २०१८ - २०२३ पगारवाढ कराराप्रमाणे नमूद कराराप्रमाणे वास्तविक प्रवासाच्या आधारावर १ जानेवारी २०२० पासून फरकासह वाढीव २० लिटर पेट्रोलभत्ता मिळावा यासह अनेक इतर मागण्या संदर्भातील निवेदन मा.व्यवस्थापकीय संचालक म. रां. वि. मंडळ यांना संयुक्त कृती समिती लाईनस्टाफ यांनी वारंवार दिलेले आहे,हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र राज्य वीज लाईनस्टाफ बचाव कृती समिती यांनी उपरोक्त उपस्थित केलेल्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने प्रधान सचिव (ऊर्जा), अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण व संचालक (मानव संसाधन), महावितरण यांच्या स्तरावर संघटनेसमवेत वेळोवेळी झालेल्या बैठकांत सकारात्मक चर्चा करण्यात येऊन बैठकांचा लेखी इतिवृत्तांत संघटनेस वेळोवेळी देण्यात आलेला आहे. इंधन भत्ता व विज बील वसुलीबाबत परिपत्रक महावितरणद्वारे निर्गमित करण्यात आले असून इतर मागण्या विचाराधीन आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील निळ्या व लाल पूर नियंत्रण रेषेबाबत निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत

**(१८) २१४६२ (०४-०१-२०२४) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील अकोला, वाशीम व बुलढाणा येथे पाटबंधारे विभागाच्या अनागोंदी कारभारामुळे पूर नियंत्रण रेषेमध्ये गोंधळ निर्माण झाला असून पाटबंधारे विभाग व इतर विभागामध्ये समन्वय नसल्यामुळे आज पावेतो पूर नियंत्रण रेषा निश्चित करणेबाबत कोणताच निर्णय घेण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला जिल्हाचे कार्यकारी अभियंता यांनी निळया व लाल पूर रेषा निश्चित करताना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने पूर नियंत्रण रेषेचे ५० वर्षापूर्वी असलेले निकष बदलण्याबाबत व सं ्बंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.
जलसंपदा विभागाचे शासन परिपत्रक क्र. पूरनि-२०१८/((प्र.क्र.१८२/२०१८)सिं.व्य. (महसूल) दिनांक ३/०५/२०१८ मधील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करुन अकोला शहरातुन वाहणाऱ्या मोर्णा व विद्रुपा नदीचे पूर रेषा नकाशे तयार करण्यात आले असून दिनांक २६/०९/२०२३ रोजी जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.
(२) नाही.
उपरोक्त नमूद शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार निळया व लाल पूररेषा निश्चितीची कार्यवाही करण्यात आली असल्याने त्यात गैरव्यवहार झालेला नसल्याचे निदर्शनास येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी निवासी औद्योगिक कॉलनीला घरगुती दराने पाणी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१९) २२०१२ (०४-०१-२०२४) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी निवासी औद्योगिक वसाहतीला घरगुती दराने पाणी उपलब्ध करून देण्याबाबची माहिती महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील पाण्याच्या स्त्रोतावर दरांमध्ये एकरूपता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने आणली असून राज्याला शाश्वत व स्थायी जलसुरक्षा प्रदान करण्याचे लक्ष ठेवून पाणी दराचेही निर्धारण करत प्राधिकरणाने २०२५ पर्यंत पाण्याचे दर निश्चित केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील विविध घरगुती नळ योजनांना जलसंपदा विभागाकडून प्रति हजार लिटर ६२ पैसे दर देत असताना यामध्ये सिंचनासाठी प्रति एकर १००० लिटर ला १५ पैसे, घरगुती वापरासाठी प्रति १००० लिटरला ६२ पैसे व उद्योगासाठी १३ रुपये तर उद्योगांना ७५% पर्यंत सबसिडी देण्यात येवून

औद्योगिक वसाहती मधील कर्मचाऱ्यांच्या वसाहतींना ६२ पैसे दराने पाणी मिळणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी ठोक जलप्रशुल्क निर्धारण आदेश निर्गमित केले आहे. त्यात औद्योगिक घटकातील घरगुती पाणी वापराच्या अनुषंगाने घरगुती दराने आकारणी करण्याची तरतूद करण्यात आली आहे.
(२) होय. प्राधिकरणाने दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी तिसरे ठोक जलप्रशुल्क निर्धारण आदेश निर्गमित केले असून ते दिनांक ०१ जुलै, २०२२ ते दिनांक ३० जून, २०२५ पर्यंत लागू असणार आहेत.
(३) व (४) प्राधिकरणाकडून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मधील कलम ११ (घ) नुसार सिंचन व्यवस्थापनाच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या संपूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल अशा तऱ्हेने पाणीपट्टीदर निश्चित करण्यात आले आहे. प्राधिकरणाने ठोक जलप्रशुल्क निर्धारण आदेशामध्ये निर्धारित केलेले जलप्रशुल्काचे दर ०१ जुलै, २०२२ पासून ३० जून, २०२३ पर्यंत लागू असतील. सदर आदेशातील परिच्छेद ६.० व ७.० नुसार सदर दर १०% वाढीसह ०१ जुलै, २०२३ पासून ३० जून, २०२४ व २०% वाढीसह ०१ जुलै, २०२४ पासून ३० जून, २०२५ पर्यंत लागू असतील.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे मागील नऊ महिन्यांचे कमिशन अदा करण्याबाबत

**(२०) २२५३० (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १९ जिल्ह्यांमधील स्वस्त धान्य दुकानदारांचे मागील नऊ महिन्यांचे जवळपास १९० कोटी कमिशन थकल्याने दुकानदारांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वित्तीय सल्लागार आणि उपसचिव कार्यालयाकडून माहे जुलै, २०२३ पर्यंतचे धान्य वितरणाचे कमिशन वितरित करण्यात आले असता नाही स्वस्त धान्य दुकानदारांना अद्याप कमिशनचे वाटप केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्वस्त धान्य दुकानदार संघटनेने निवेदन दिल्यानंतर शासनाने दखल घेतली असून १९ जिल्ह्यातील पुरवठा अधिकाऱ्यांकडून सदर कमिशन अद्यापपर्यंत अदा करण्यात आले नाही, याबाबतचा खुलासा मागवला आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, १९ जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना मागील नऊ महिन्याचे कमिशन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२३-०२-२०२४) :** (१) व (२) राज्यातील रास्त भाव दुकानदारांना देय असलेले कमिशन / मार्जिनची रक्कम थेट त्यांच्या खात्यात वर्ग करणेबाबतची कार्यवाही माहे जुलै, २०२३ पासून सुरु करण्यात आली आहे. याकरीता वित्तीय सल्लागार व उप सचिव त्यांचे कार्यालयाकडून (SNA) मार्फत अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) वर माहे जानेवारी, २०२३ ते माहे जानेवारी, २०२४ या कालावधीकरीता सर्व संबंधित उपनियंत्रक, शिधावाटप व जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच अन्न वितरण अधिकारी यांना रुपये ७३८.५३ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.
(३) होय, दिनांक ०३/१०/२०२३ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये सर्व संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी / उप नियंत्रक (शिधावाटप) यांचा खुलासा मागविण्यात आला आहे.
(४) राज्यातील सर्व शिधावाटप / रास्त भाव दुकानदार यांचे मॅपिंग व पीएफएमएस प्रणालीव्दारे त्यांचे बँक खाते जोडण्याची कार्यवाही करीत असताना काही तांत्रिक अडचणी आल्याने कमिशनची रक्कम वर्ग करण्यास विलंब झालेला आहे. या संदर्भात आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या तांत्रिक सल्लागाराच्या मदतीने त्रुटी निवारण करण्याबाबतच्या सूचना दिनांक ०३/११/२०२३ रोजी पार पडलेल्या बैठकीत शासनस्तरावरुन सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत काही अपवाद वगळता बहुतांश ठिकाणी डिसेंबर, २०२३ पर्यंत कमिशन वाटप करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.